# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/01/2022 (शनिवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि. मी. अंतरावरील मौजा चांपा शिवार येथे दिनांक 30/12/2021 चे 20:00 वा. ते 20.30 वा. दरम्यान अशोक सदाशिव गजभिये (मृतक), वय 56 वर्ष रा. खापरखेडा ह.मु. चांपा हा चांपा शिवारात उमरेड नागपुर रोडने एम.एच. 353 डी नी पायदळ जात होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अशोक गजभिये धडक मारून पळुन गेला. या अपघातात ते गंभीर जखमी होवुन त्यांचा मृत्यु झाला. चौकशीत निष्पन्न झाल्याने चौकशी अहवालावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी परिपोउपनि श्रीकांत लांजेवार पो.स्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राउत मो. नं. 7020753909 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 31/12/2021 चे 09.00 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी ही आपले घरी कपडे धुवत असता फिर्यादिची मोठी मुलगी वय 22 वर्ष हि घरी कोणालाही काही न सांगता घरून निघुन गेली व दुसरी मुलगी वय 17 वर्ष हि सुदधा घरी दिसुन आली नाही. फिर्यादी यांच्या दोन्ही मुलींना अज्ञात आरोपीने कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री बोन्द्रे मो.क्र. 9823904141 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर